# रद्दी विक्री निवीदा जाहिरात

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती येथील माहिती पुस्तिके, Application kits, निरुपयोगी कागदपत्रे व वर्तमानपत्रे रद्दी विक्रीसाठी सिलबंद पाकिट निविदा मागविण्यात येत आहे. निविदा फॉर्म ची विक्री दिनांक २९/०३/२०१७ पर्यंत रु. ५०/- दराने (ना परतावा) खालील कार्यालयात स्टेशनरी विभागात कार्यालयीन वेळेत सुरु आहे. सदर निविदा दिनांक ०५/०४/२०१७ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. याबाबत शर्ती व अटी निविदा फॉर्म सोबत व कार्यालयाचे संकेतस्थळ www.jdroamt.org वर पाहता येतील.

---

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्रनिकेतन परिसर,
गाडगे नगर, अमरावती.

**माहिती पुस्तीका, Application kits, अनावश्यक कागदपत्रे, वर्तमानपत्रे यांची रद्दी खरेदीकरीता खालीलप्रमाणे अटी व शर्ती लागू राहतील.**

१. रद्दी खरेदी करण्याकरीताचा निविदा फॉर्मचा नमुना या कार्यालयामधिल स्टेशनरी विभागात रु. ५०/- प्रति फॉर्म (परत न करण्यात येणारी रक्कम) कार्यालयीन वेळेत **दि. २९/०३/२०१७** पर्यंत उपलब्ध आहेत.

**२. माहिती पुस्तिका, Application kits, दैनिक वर्तमानपत्रे आणि अनावश्यक कागदपत्रे या साहित्याचा रद्दी भावात खरेदीचे स्वतंत्र दर निवीदा फॉर्ममध्ये नमुद करणे बंधनकारक आहे.**

३. आपले सिलबंद दरपत्रक निवीदा या कार्यालयास **दि. ०५/०४/२०१७** पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठविण्यात यावे.कार्यालयीन वेळेनंतर आणि दिलेल्या मुदती नंतर प्राप्त झालेले दरपत्रक निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.

४. सिलबंद निविदा सादर करतांना त्यासोबत रद्दी खरेदीबाबतच्या परवान्याची (Licence) प्रत जोडावी. सोबत परवाना धारकाचे पॅन कार्ड / आधार कार्डाची छायांकीत प्रत जोडावी.

५. दरपत्रक निविदा सादर करतेवेळेस रु. १००००/- अनामत रक्कम रोखीने अथवा डीमांड ड्राफ्ट व्दारे Joint Director, Technical Education Regional Office, Amravati यांचे नावाने अमरावती शाखेकरीता देय असलेला जमा करावा लागेल. दरपत्रक निविदा मंजूर न झाल्यास जमा अनामत रक्कम रद्दीविक्रीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच परत करण्यात येईल.

६. दुस-या क्रमांकावरील निविदा धारकाची अनामत रक्कम प्रथम मंजुर निविदा धारकाची रद्दी खरेदीबाबतची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर देण्यात येईल. प्रथम खरेदीदाराने कार्यवाही पुर्ण केली नाही तर दुस-या खरेदीदारास निविदा मंजूर करण्याचे अधिकार या कार्यालयाकडे राखीव ठेवण्यात येत आहेत.

७. निविदा धारकांना कार्यालयीन वेळेत निविदा उघडण्याचे तारखेपर्यंत एक वेळ जागेवर प्रत्यक्ष रद्दीची पाहणी करण्याची परवानगी आहे.

८. ज्या खरेदीदाराची दरपत्रक निविदा मंजुर होईल त्यांनी नमुद संपुर्ण रद्दीचे साहित्याच्या रकमेचा भरणा करुन स्वयंजबाबदारीवर साहित्य घेऊन जाणे बंधनकारक राहिल. अन्यथा त्यांना अनामत रक्कम परत मिळणार नाही. दुस-या क्रमांकावरील खरेदीदारास संधी उपलब्ध करुन देण्याबाबतचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.

९. दरपत्रक निविदा या कार्यालयात **दि. ०६/०४/२०१७** रोजी दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येतील. दरपत्रक निविदा उघडण्याचे वेळेस आपण अथवा आपले प्रतिनिधी यांना उपस्थित राहण्यास परवानगी देण्यात येईल.

१०. मंजूर झालेल्या जास्तीत जास्त दराने खरेदी करणा-या दरपत्रक निविदेनुसार खरेदीदाराने संपुर्ण रद्दी स्वखर्चाने नेण्याची व्यवस्था करावी. त्यासाठीचा वाहतुकीचा खर्च, मनुष्यबळ खर्च संबंधीतास स्वतः करावा लागेल.

११. रद्दी खरेदीदारास माहिती पुस्तिका, Application kits, कार्यालयीन कागदपत्रे ही रद्दी कागदाचा लगदा करण्याकरीताच वापरण्यात येईल याबाबतचे हमीपत्र रु. १००/- चे स्टँम्प पेरपरवर सादर करावे लागेल.

१२. रद्दीचा वजनकाटा या कार्यालयातील राजपत्रित अधिका-यांचे समक्ष करण्यात येईल.

१३. रद्दी खरेदीदारास नियमानुसार विक्रीकर व सर्वसाधारण कर भरावा लागेल.

१४. रद्दी खरेदीचा संपुर्ण खरेदीचा भरणा कार्यालयात केल्यानंतरच रद्दी कार्यालयाबाहेर नेण्याची परवानगी देण्यात येईल. रकमेचा भरणा केल्याची शासकीय पावती देण्यात येईल.

१५. आवश्यकता वाटल्यास सदर अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार सहसंचालकांना राहिल.

१६. कोणत्याही कारणास्तव दरपत्रक मंजुर करणे/नाकारणे याबाबतचे संपुर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकारांकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

दिनांक : 18 MAR 2017

(डॉ. डी. एन. शिंगाडे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
अमरावती